


रत्नप्रिया प्रकाशन,सोलापूर ISBN-978-81-950171-3-3



# माझ्या विदर्भ भूमीत. . . .

प्रातिनिधिक कवितासंगह

काव्यप्रेमी शिक्षक मंच

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



# सहभागी कवी

२९) श्री . श्याम चौकडे
३०) सौ . मंजू वणवे
३१) सौ . कुमुद कोरडे
३२) श्री . रणजीत पवार
३३) श्री . आनंद घोडके
३४) सौ . हेमांगी बोंडे
३५) सौ . रझिया जमादार
३६) श्री . जमालोद्दीन हैदर शेख
३७) सौ . निशा खापरे
३८) श्री . नाना फडणीस
३९) श्री . दीपक सपकाळ
४०) श्री . मुकुंदराव जाधव
४१) सौ . कविता कठाने
४२) डॉ . शितल शिवराज मालुसरे
४३) श्री . कृष्णा शिंदे
४४) श्री . शरद शिरस
४५) सौ . सविता सामंत
४६) श्री . रामदास देशमुख
४७) श्री . कालिदास चवडेकर
४८) श्री . दिनेश वाडेकर
४९) श्री . विजय बिंदोड
५०) श्री . पी . नंदकिशोर
५१) सौ . साधना काळबांडे
५२) सौ . प्रिती गोगटे
५३) श्री . युवराज जगताप
५४) सौ . शिल्पा भांडारी
५५) सौ . मुग्धा कुळये
५६) श्री . सत्येंद्र राऊत

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

## माही वऱ्हाळी

माही वऱ्हाळी सुगंधी
जस चंदनाचं खोड
कशी गुयचट लागे
माह्या वऱ्हाळीची फोळ
हयदीच्या पानातला
पयसाच्या फुलातला
रंग आंगभर लेली
अबायाच्या कुळीतला
दूर मातीच्या वटीत
तिचं खोलवर मुय
डांगोडांगी धटवट
तिचं जादूवानी खुय
उजयलं तिनं भायकसं
वानवू मी किती सच्या
कान्या कोपऱ्यात
तिची यते परचिती
चव वठी रेंगायते
गावरानी आंब्यावानी
वधंबला हरकानं
बोल वऱ्हाळीचा कानी
साता समुंदरापार
हाये मोठा बोलबाला
यकयक शब्द तिचा
बिजलीचा हात झाला
ओंजयीत लपवा वं
मखमलात ठुवावं
माह्या वऱ्हाळीचं ऋन
कायजात मुरवावं
घेते कुशीत मायेनं
जिव्हायाचं रान
व्हते माय जशी
पदरात लेकराले लाळवते
लवलव तलवार
वऱ्हाळीचा कनकन
कई सयदाच्यावानी
भिजोते ते सरे मनं
तिचं साधं भादं रूप
हाये असी गुनवान
आम्ही वराळचे लोकं
लय तिचा अभिमान

सौ. रंजना कराळे, अमरावती
७२१९६५४२९४

## वऱ्हाड

माह्या वऱ्हाड प्रांताची
कायी कसदार माती,
राघुसंग गाई मैना
गोड गानी पिरतीची.
पिकं डोलते शिवारी
तूर मूंग न जवारी,
कशी गोफन फिरते
मंग हिरव्या शिवारी.
दही शिपल्या वावरी
भारी पिकतो कापूस,
दान धरम उत्सव
सणासुदीची हाऊस.
खाई आनंदानं इथं
लोक झुनका भाकर,
भोया वऱ्हाडी माणूस
मानी ईठुचा चाकर.
काया जरी हो माणूस
मोठ्या मनाचं कायीज,
देवी रुक्मिणीची किर्पा
झालं वऱ्हाडाचं चीज !
करू जाता गुणगान
धारा सयदाच्या झरती,
पडे शवुदाचा तोटा
गाता वऱ्हाड महती !

डॉ. सत्येंद्र संगाप्पा राऊत
अणदूर

Principal
Arts, Science & Commerce College,
Tuljapur Dist, Osmanabad